कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली

दिनांक :— १५.०५.२०२५

## प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक बालाजी पांडुरंग पवार, वय—५४ वर्षे, पद—वनपाल, वर्ग—३, कार्यालय वनपरीक्षे. अधिकारी, (प्रादेशिक), ता. वसमत जि.हिंगोली यांनी तक्रारदार यांना त्यांचे लाकडाचे वाहतुकीसाठी ट्रक्टर चालू देवून त्याच्यावर कारवाई न करण्यासाठी स्वत:साठी २०,०००/—रू. व वनरक्षक नाईकवाडे याचेसाठी १०,०००/—रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिली व दिनांक ०४.०४.२०२५ रोजी वनरक्षक नाईकवाडे यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता तेथे लोकसेवक पवार व नाईकवाडे हजर असतांना त्यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने वनरक्षक नाईकवाडे यांनी लाचेची मागणी केली नाही. त्यावरून दिनांक. १५.०५.२०२५ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादवरून लोकसेवक पवार, वनपाल यांचे विरूध्द पोस्टे वसमत ग्रामीण. जि.हिंगोली येथे गुन्हा गु.र.न.१३६/२०२५ क. ७, ७ अ भ्र.प्र.अधि. १९८८ दि.१५.०५.२०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.**

---

दिनांक ०२.०४.२०२५ रोजी यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीची दि. ०२.०४.२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील लोकसेवक बालाजी पांडुरंग पवार, वनपाल यांनी तक्रारदार यांना लाकडाची वाहतूकीसाठी ट्रक्टर चालू देऊन त्याच्यावर कारवाई न करण्यासाठी स्वत:साठी २०,०००/—रू. वनरक्षक नाईकवाडे यांचेसाठी १०,०००/—रू. अशी ३०,०००/—रू. पंचासमक्ष लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली.

त्यावरून दिनांक ४.०४.२०२५ रोजी वनरक्षक नाईकवाडे यांची पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्या करीता पंचासमक्ष तक्रारदार यांना पाठविले असता. तेथे वनरक्षक नाईकवाडे व वनपाल पवार यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने वनरक्षक नाईकवाडे यांनी तक्रारदार यांना पैशाची मागणी केली नाही.त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक नाईकवाडे व पवार यांना भेटण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांची भेट झाली नाही.

लोकसेवक पवार यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने ते तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत अशी तक्रारदार यांची खात्री झाल्याने, दि.१५.०५.२०२५ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादी वरून लोकसेवक बालाजी पांडुरंग पवार, वय—५४ वर्षे, पद—वनपाल, वर्ग—३, कार्यालय वनपरीक्षेत्र. अधिकारी, (प्रादेशिक), ता. वसमत जि.हिंगोली यांचेवर पोस्टे वसमत ग्रा. ता.वसमत जि.हिंगोली येथे वर नमुद प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

ही कामगिरी श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, डॉ. संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांनी पोहेकॉ श्री.तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींगे, राजाराम फुपाटे, भगवान मंडलीक, चापोना श्री शेख अकबर अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अ‍ॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**श्री. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९२२६४८४६९९**

**श्री. विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, मो.नं. ९३५९१२८८८९**

**टोल फ्री क्र.—१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६—२२३०५५, व्हॉट्सअ‍ॅप नंबर ९३५९१२८८८९**

**विकास घनवट**
**पोलीस उप अधिक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.**